करोना 2020/सूचनां/आदेश क्र. ९६६

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- 02141-222118/222097/222001 फॅक्स क्रमांक: 02141-222025/227451
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि. ९ /04/2020

वाचले:- 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005
2) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना 2020/प्र.क्र.58/ आरोग्य 5 दि.13/03/2020
3) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, 1897 ची नियमावली दि.14/03/2020
4) साथ रोग अधिनियम 1897
5) मा. गृह सचिव, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कडील आदेश क्र. 40-3/2020-DM-I(A) दि. 29/03/2020

**आदेश**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

शासनाने करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि.13/03/2020 लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.2 कडील अधिसूचना लागू करण्यात आलेली आहे.

जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषीत केला आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण देशात दि. 14/04/2020 पर्यंत संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जिल्हयातील सर्व प्रकारचे उद्योग व त्यांच्या आस्थापना, आय.टी व सॉफ्टवेअर कंपन्या व खाजगी आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळून) बंद करण्याबाबत आदेश पारीत करण्यात आलेले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.5 कडील आदेशाव्दारे मा. गृह सचिव, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी आदेशीत केले आहे की, 1) संचारबंदी काळात बंद करण्यात आलेल्या सर्व प्रकारचे उद्योग व त्यांच्या आस्थापना, आय.टी व सॉफ्टवेअर कंपन्या व खाजगी आस्थापना यांनी त्यांच्या आस्थापनेमधील कर्मचारी यांच्या वेतनामध्ये कोणतीही कपात न करता त्यांना संचारबंदी काळातही संपूर्ण वेतन अदा करावे. 2) त्याचप्रमाणे भाडेतत्वावर राहणारे सर्व स्थलांतरीत कर्मचारी/कामगार यांच्याकडून पुढील एक महिन्याचे घरभाडे मागणी करु नये.3) जर कोणी घरमालक / औद्योगीक अथवा खाजगी आस्थापना कामगार किंवा विदयार्थी यांना घरभाडे दिले नसल्याचे कारण देवून घर खाली करणेबाबत दबाव आणत असेल तर अश्या घरमालकांवर / औद्योगीक अथवा खाजगी आस्थापनेवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005 अंतर्गत कारवाई करणेत येईल

त्याअर्थी, मी, श्रीमती निधी चौधरी, जिल्हाधिकारी, रायगड मला उपोदघातातील अ.क्र.3कडील नमूद अधिसूचनेव्दारे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार आदेशीत करत आहे की

**1) जिल्हयातील सर्व उद्योग व त्यांच्या आस्थापना, आय.टी व सॉफ्टवेअर कंपन्या व खाजगी आस्थापना यांनी त्यांच्या आस्थापनेमधील कर्मचारी यांच्या वेतनामध्ये कोणतीही कपात न करता त्यांना संचारबंदी काळातही संपूर्ण वेतन अदा करावे.**

**2) त्याचप्रमाणे भाडेतत्वावर राहणारे सर्व स्थलांतरीत कर्मचारी/कामगार यांच्याकडून पुढील एक महिन्याचे घरभाडे मागणी करु नये.**

**3) जर कोणी घरमालक / औद्योगीक अथवा खाजगी आस्थापना, कामगार किंवा विदयार्थी यांना घरभाडे दिले नसल्याचे कारण देवून घर खाली करणेबाबत दबाव आणत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम - 2005 अंतर्गत कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.**

सदर आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा. उक्त आदेशाचे पालन न केल्याचे निर्दशनास आल्यास संबंधिताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 56 तसेच भारतीय दंड संहिता, 1960 चे कलम 188 अन्वये कारवाई करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

**प्रति,**

1. सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य रायगड.
2. कामगार उपायुक्त रायगड.
3. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड
4. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अलिबाग, महाड, पनवेल.

प्रत:-

1. मा. गृहसचिव,गृहविभाग भारत सरकार, उत्तर विभाग, नवी दिल्ली - 111 001 यांसकडे माहितीस्तव सादर
2. मा.सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे माहितीस्तव सादर.
3. मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे माहितीस्तव सादर.
4. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीस्तव सादर.
5. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांजकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
6. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
7. जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
8. उपविभागीय अधिकारी (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
9. तहसिलदार(सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

DISTRICT MAGISTRATE
जिल्हा दंडाधिकारी
रायगड-अलिबाग
RAIGAD-ALIBAG

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग